ePaper
# पंतप्रधानांच्या शिर्डी दौऱ्याच्या पार्श्वभूमीवर भाजपमध्ये दक्षिण-उत्तर वाद पेटला

| वर्ष - 7 । अंक - 163 | UDYAM-MH-26-0158827 |

महाईन्यूज ™
लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

www.mahaenews.com । गुरुवार, दिनांक 19 ऑक्टोबर 2023 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews



## आतील पानांत

- न्यूझीलंडची विजयी घोडदौड सुरूच!
- प्रियांका तेलंगणा निवडणूक प्रचारात!
- राज्यपाल इकडे तिकडे फिरत असतात
- केवळ मतांच्या राजकारणाचा विचार!

# मस्तवाल बिल्डरला "धुतले"!

## भाजपच्या माजी नगरसेविकेच्या पतीचा पिंपरी महापालिकेत राडा

### भाजपच्या माजी नगरसेविकेच्या पतीचा पिंपरी महापालिकेत राडा

।पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**महापालिकेत भाजपाच्या माजी नगरसेविकेच्या पतीने एका बिल्डरला लाथा-बुक्क्यांनी मारहाण केली आहे. हा सगळा प्रकार सीसीटीव्ही कॅमेऱ्यात ही कैद झाला आहे. महापालिकेत राडा घालणारे नितीन बोऱ्हाडे हे भाजप आमदार महेश लांडगे यांचे कट्टर समर्थक आणि माजी नगरसेविका सारिका बोऱ्हाडे यांचे पती आहेत.**



नितीन बोऱ्हाडे यांचे चुलते आणि नरेश पटेलांची बोऱ्हाडेवाडीत जमीन आहे. सर्व्हे नंबर ६४४ मध्ये दोघांची जमीन एकमेकांना लागून आहे. त्याच जमिनीतून डीपी मार्ग जातो, त्यावरून दोघांमध्ये वाद सुरु आहेत. त्याची सुनावणी आज महापालिकेत होती. त्या सुनावणीनंतर नितीन बोऱ्हाडे आणि नरेश पटेलांमध्ये वाद झाले. प्रकरण हाणामारीपर्यंत गेले. महापालिकेच्या सुरक्षा रक्षकांनी बोऱ्हाडे यांना रोखले आणि प्रकरण तिथेच निवळले. मात्र हा संपूर्ण प्रकार सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झाला.

**मारहाणीनंतर नितीन बोऱ्हाडे यांचे स्पष्टीकरण...**

'तुम्ही न्यायालयात जा अथवा कुठे ही जा, मला फरक पडत नाही', असे नरेश पटेल माझ्या चुलत्याला बोलले. हे अशोभनीय होते, त्याच रागात हे घडले, असे मारहाणीनंतर नितीन बोऱ्हाडे यांनी स्पष्टीकरण दिले. तर मी असे काहीच बोललो नाही, उलट डीपीनुसार मार्ग होऊ द्या. त्यानुसार झाल्यास मलाच फायदा होणार होता. त्यामुळे बोऱ्हाडे यांनीच न्यायालयात जाण्याची भाषा वापरल्याचा दावा नरेश पटेलांनी केला. तसेच बिल्डर नरेश पटेलांनी तक्रार करणार नसल्याचे म्हटले आहे.

## पिंपरी-चिंचवडमधील समाविष्ट गावांतील पाणी समस्या सुटणार

। पिंपरी । प्रतिनिधी : महाईन्यूज

चिखली आणि परिसरातील सुमारे ९० हजार नागरिकांचा पाणीपुरवठा सक्षम करण्यासाठी महापालिका प्रशासनाच्या माध्यमातून चिखली जलशुद्धीकरण केंद्रातून थेट पाइपद्वारे पाटीलनगर येथील जलकुंभात पाणी दिले जाणार आहे. पवना आणि आंद्रा प्रकल्पातील एकत्रित पाणी मिळणार असल्याने भोसरीजवळील समाविष्ट गावांतील पाणी समस्या सुटणार आहे. चिखलीत महापालिका प्रशासनाने २० लाख लीटर क्षमतेचा जलकुंभ उभारला आहे. या जलकुंभात पवना प्रकल्पातील रावेत बंधाऱ्यातून सुमारे १६ दशलक्ष लीटर (एमएलडी) पाणी दिले जाते. एक दिवस २० ते २२ तास आणि दुसऱ्या दिवशी तीन ते चार तास पाणी पुरवठा होतो. आता प्रशासनाने आंद्रा प्रकल्पातील पाण्यासाठी चिखली येथे नवीन जलशुद्धीकरण केंद्र उभारले आहे. त्यातील पाणी पाटीलनगर येथील जलकुंभात आणण्यासाठी ६०० एमएम जलवाहिनी टाकण्यात आली आहे. त्यामुळे पवना आणि आंद्रा अशा दोन्ही प्रकल्पाचे पाणी उपलब्ध झाल्यामुळे पाणी पुरवठा सुरळीत होण्यास मदत होणार आहे. समाविष्ट गावांत भविष्यातील ३० वर्षांच्या वाढत्या लोकसंख्येचा विचार करून पाणी पुरवठा यंत्रणा सक्षम केली जात आहे.

# महाराष्ट्र पुन्हा एकदा परकीय गुंतवणुकीत पहिल्या क्रमांकावर!

## उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे प्रतिपादन

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**जगभरात सध्या भारताकडे गुंतवणुकीचे एक मोठे स्थान म्हणून बघितले जात आहे. त्यातही राज्यात गुंतवणुकीसाठी विचारणा होत असून त्यात पुण्याचाही समावेश आहे. युती सरकारच्या काळात महाराष्ट्र गुंतवणुकीत पहिल्या क्रमांकाचे राज्य होते. मध्यंतरीच्या दोन वर्षांच्या काळात हा क्रमांक इतर राज्यांनी हिरावून घेतला. मात्र, आता पुन्हा एकदा महाराष्ट्र परकीय गुंतवणुकीत पहिल्या क्रमांकावर असल्याचे प्रतिपादन उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.**



पुण्यातील जनता सहकारी बँकेच्या अमृत महोत्सवी वर्षाच्या पदार्पण कार्यक्रमात ते बोलत होते. उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील, भुषण स्वामी, बँकेचे अध्यक्ष रवींद्र हेजीब, उपाध्यक्षा अलका पेटकर तसेच मुख्य कार्यकारी अधिकारी जगदीश कश्यप व्यासपीठावर उपस्थित होते.

ते म्हणाले, "कोरोना काळात चीनने जगाची पुरवठा साखळी विस्कळीत केली. त्यामुळेच अनेक देशांनी चीनसह अन्य ठिकाणी देखील सुरक्षित गुंतवणुकीचा पर्याय शोधण्यास सुरुवात केली. जगाची फॅक्टरी तसेच पुरवठा साखळी ही भारतात निर्माण होऊ पाहत आहे. त्यामुळे अनेक देशांना भारतात उद्योग सुरू करावे असे वाटत आहे."

### गेल्या तिमाहीतही राज्यात सर्वाधिक परकीय गुंतवणूक

राज्यात दर आठवड्याला गुंतवणुकीसाठी विचारणा होत असल्याचे सांगून त्यातील अनेक जण पुण्यातही भेट देत असल्याचे फडणवीस यांनी स्पष्ट केले. गेल्या युती सरकारच्या काळात महाराष्ट्र गुंतवणुकीत पहिल्या क्रमांकावर होते. त्यातील एका वर्षी देशातील एकूण गुंतवणुकीपैकी ४२ टक्के तर दुसऱ्या वर्षी ४९ टक्के गुंतवणूक राज्यात झाली होती. मध्यंतरीच्या दोन वर्षांच्या काळात महाराष्ट्राचा हा क्रमांक हिरावला गेला, अशी टीका करत कर्नाटक व गुजरातमध्ये ही गुंतवणूक झाली. त्यानंतर झालेल्या सत्ता बदलामुळे राज्यात पुन्हा एकदा परकीय गुंतवणुकीचा ओघ वाढल्याचे त्यांनी सांगितले. गेल्या तिमाहीतही राज्यात सर्वाधिक परकीय गुंतवणूक झाली असून महाराष्ट्र पुन्हा एकदा गुंतवणुकीत पहिल्या क्रमांकावर आल्याचे फडणवीस म्हणाले.

# पोलिसांनीच ललित पाटीलला पळविले!

## आमदार रवींद्र धंगेकरांचा पुणे पोलिसांवर गंभीर आरोप

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**ड्रग्ज उत्पादन आणि तस्करीचे गंभीर आरोप असलेल्या ललित पाटीलला मुंबई पोलिसांनी अटक केली. यानंतर त्याने कोर्टात हजर केलं जात असताना मी ससून रुग्णालयातून पळून गेलो नाही, तर मला पळवून लावण्यात आलं, असा गंभीर आरोप केला. यावर या प्रकरणाचा सातत्याने पाठपुरावा करणाऱ्या पुण्यातील काँग्रेसचे आमदार रवींद्र धंगेकर यांनी प्रतिक्रिया दिली.**



ललित पाटीलचा तुरुंग ते पंचतारांकित हॉटेल असा प्रवास महिनोंमहिने सुरू होता. आज पुणे शहर अमली पदार्थाने वेढलं आहे. अनेक तरुण व्यसनाधीन झाले आहेत. ललित पाटील केवळ पुण्यापुरता मर्यादित नव्हता. तो महाराष्ट्रभर आणि भारताच्या सीमेपर्यंत हे काळेधंदे करत होता. त्याचे मोठे कारखानेही उद्ध्वस्त झालेले आपण पाहिले. "या प्रकरणात पुणे पोलिसांची भूमिका संशयास्पद आहे. पुणे पोलिसांनी ललित पाटीलला पंचतारांकित सेवा दिली आणि पळून जाण्यासाठी मदत केली. हे इथंच थांबलं नाही, तर १५ दिवस तो सापडत नव्हता. पुणे पोलिसांचे १० पथकं वेगवेगळ्या भागात पाठवण्यात आले.

परंतु, आजी-माजी पोलीस अधिकारी ललित पाटीलबरोबर आहेत हे मी पहिल्या दिवसापासून सांगत होतो. तो हा व्यवसाय एकटा करत नव्हता. त्याला पोलिसांचा वरदहस्त होता," असा आरोप रवींद्र धंगेकर यांनी केला. रविंद्र धंगेकर पुढे म्हणाले, "कोट्यावधी रुपयांच्या अमली पदार्थांचा काळाधंदा करणारा ललित पाटील सापडला, पण मुंबई पोलिसांना सापडला. म्हणजेच कुठल्यातरी पोलिसाने त्याला मॅनेज करून तिथं थांबवलं आणि तिथून त्याला अटक केली.

### मुंबई व पुणे पोलिसांचं अपयश

» या प्रकरणात पुणे पोलिसांची भूमिका संशयास्पद आहे. पुणे पोलिसांनी ललित पाटीलला पंचतारांकित सेवा दिली आणि पळून जाण्यासाठी मदत केली. हे इथंच थांबलं नाही, तर १५ दिवस तो सापडत नव्हता. पुणे पोलिसांचे १० पथकं वेगवेगळ्या भागात पाठवण्यात आले. परंतु, आजी-माजी पोलीस अधिकारी ललित पाटीलबरोबर आहेत हे मी पहिल्या दिवसापासून सांगत होतो. तो हा व्यवसाय एकटा करत नव्हता. त्याला पोलिसांचा वरदहस्त होता," असा आरोप रवींद्र धंगेकर यांनी केला.

हे मुंबई पोलीस व पुणे पोलिसांचं अपयश आहे. हा अचानक पहाटे सापडतो, कोणता पोलीस पहाटे उठतो. "पुणे पोलिसांनी ललित पाटीलला पळवून लावण्यासाठी प्रयत्न केले. यात पुणे पोलिसांचं अपयश आहे. कारण एवढ्या मोठ्या प्रमाणात अमली पदार्थ विकणारा राजरोसपणे फिरतो कसा? पोलिसांनी त्याला पळून जाण्यासाठी मदत केली ही वस्तुस्थिती आहे. सर्वांनी त्याचा व्हिडीओ पाहिला आहे. तो मुंबई पोलिसांना सापडला म्हणजे त्याची पाळंमुळं अनेक अधिकाऱ्यांपर्यंत पोहचली आहेत. याचा तपास पुणे पोलिसांकडूनही होणार नाही आणि मुंबई पोलिसांकडूनही होणार नाही. त्याचा तपास सीआयडीकडे द्यावा," अशी मागणी धंगेकरांनी केली.

# रेल्वेच्या कामाची नऊ खासदारांकडून झाडाझडती!

## आढावा बैठकीत एकूण तीनशेहून अधिक मुद्द्यांवर चर्चा

। पुणे ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

**मध्य रेल्वेच्या पुणे आणि सोलापूर विभागातील कामांचा नऊ खासदारांनी आढावा घेतला. या बैठकीत खासदारांनी रेल्वेच्या कामाची झाडाझडती घेतली. अमृत भारत स्थानक योजनेअंतर्गत रेल्वे स्थानकांची सुरू असलेली कामे, प्रवासी सुविधांशी संबंधित विकासकामे आणि रेल्वेशी संबंधित समस्या यावर चर्चाही करण्यात आली.**



पुण्यातील विभागीय रेल्वे व्यवस्थापक कार्यालयात झालेल्या या बैठकीला खासदार श्रीनिवास पाटील, वंदना चव्हाण, सदाशिव लोखंडे, श्रीरंग बारणे, डॉ. जयसिद्धेश्वर शिवाचार्य महास्वामी, डॉ. सुधाकर श्रृंगारे, रणजितसिंह नाईक निंबाळकर, धैर्यशील माने, ओमराजे निंबाळकर आदी उपस्थित होते. मध्य रेल्वेचे सरव्यवस्थापक नरेश लालवाणी आणि विविध विभागांच्या प्रमुखांसह पुणे आणि सोलापूर विभागाचे विभागीय रेल्वे व्यवस्थापक बैठकीला हजर होते.

बैठकीत खासदारांनी सरव्यवस्थापक आणि इतर वरिष्ठ अधिकाऱ्यांशी चालू असलेल्या आणि पूर्ण झालेल्या विविध रेल्वे प्रकल्पांवर सविस्तर चर्चा केली. बैठकीत श्रीरंग बारणे यांची पुणे रेल्वे विभागाच्या विभागीय संसदीय समितीच्या अध्यक्षपदी आणि डॉ. जयसिद्धेश्वर शिवाचार्य महास्वामी यांची सोलापूर रेल्वे विभागाच्या विभागीय संसदीय समितीच्या अध्यक्षपदी निवड

> पुणे-लोणावळा तिसरी आणि चौथी मार्गिकेचे काम लवकर सुरू करावे. पुणे-लोणावळा लोकलच्या सेवेत वाढ करावी आणि दौंडपर्यंत या सेवांचा विस्तार करावा. लोणावळा-दौंड विभागात ईएमयू रेक देखभाल डेपो तयार करण्यात यावा.
>
> **-वंदना चव्हाण,** खासदार

> अमृत भारत योजनेअंतर्गत स्थानकांची कामे लवकर पूर्ण करावीत. पुणे ते लोणावळा लोकलची सेवा वाढवायला हवी. रेल्वे मार्गांवर अनेक ठिकाणी भुयारी मार्ग आणि उड्डाणपुलांची उभारणी आवश्यक आहे.
>
> **-श्रीरंग बारणे,** खासदार

करण्यात आली.

पुणे विभागाच्या विभागीय रेल्वे व्यवस्थापक इंदू दुबे आणि सोलापूर विभागाचे विभागीय रेल्वे व्यवस्थापक नीरजकुमार दोहरे यांनी पूर्ण झालेल्या आणि चालू असलेल्या कामांचे सादरीकरण केले.

प्रवासी गाड्यांना नवीन थांबे, विविध स्थानकांवर पुरविण्यात आलेल्या लिफ्ट आणि एस्केलेटर सुविधा, लेव्हल क्रॉसिंग रेल्वे फाटकाच्या जागी भुयारी मार्ग, उड्डाणपूल, रेल्वे मार्गांचे दुहेरीकरण, रेल्वे थांबे, फलाट विस्तार, नवीन गाड्यांचे विद्युतीकरण, एलईडी दिवे, यूटीएस मोबाइल उपयोजन तिकीट प्रणाली, स्थानकांचे सुशोभीकरण आदी विविध विषयांवर बैठकीत सविस्तर चर्चा करण्यात आली. या बैठकीत एकूण तीनशेहून अधिक मुद्द्यांवर चर्चा झाली.

# आगामी निवडणुकीत ‘फ्रेंड्स ऑफ बीजेपी’ महत्वाची भूमिका बजावणार!

## शहराध्यक्ष शंकर जगताप यांचे मत; पिंपरीमध्ये नितीन भोगले तर चिंचवडसाठी रवींद्र प्रभुणे यांची नियुक्ती

। पिंपरी ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

**आगामी लोकसभेच्या दृष्टीकोनातून प्रदेश भाजपाच्या वतीने फ्रेंड्स ऑफ बीजेपी हे अभियान राबविण्यात येत आहे. राज्यातून किमान ४५ पेक्षा अधिक जागा विजयाचे लक्ष्य ठेवण्यात आले असून विविध नागरिकांशी संपर्क ठेवणे, पक्षाची विचारधारा लोकांपर्यंत पोहचविण्याच्या दृष्टीकोनातून ‘फ्रेंड्स ऑफ बीजेपी’चे संयोजक महत्वाची भूमिका बजाविणार आहेत, असे मत भाजपाचे शहराध्यक्ष शंकर जगताप यांनी व्यक्त केले.**



प्रदेश भाजपाच्या वतीने पिंपरी विधानसभेसाठी नंदू उर्फ नितीन भोगले तर चिंचवड विधानसभेसाठी रवींद्र प्रभुणे यांची निवड फ्रेंड्स ऑफ बीजेपी संयोजक म्हणून करण्यात आली आहे. यावेळी शहराध्यक्ष शंकर जगताप यांच्या हस्ते या नियुक्तीपत्र देण्यात आले. यावेळी राष्ट्रीय महिला आघाडीच्या प्रवक्त्या उषा वाजपेयी आणि मावळ लोकसभा संयोजक प्रमोद देशक, वरिष्ठ जिल्हा उपाध्यक्ष व प्रवक्ते राजू दुर्गे, सरचिटणीस विलास मडेगिरी, चिंचवड विधानसभा प्रमुख काळुरामजी बारणे, पिंपरी विधानसभा प्रमुख अमित गोरखे व इतर संघटनेतील पदाधिकारी कार्यकर्ते उपस्थित होते.

२०१४ नंतर देशात असा मोठा जनसमुदाय तयार झाला ज्यांना कोणतीही राजकीय महत्वकांक्षा नाही पण पक्षाशी विचारधारा कार्यपद्धती व विकास निती आवडते अशा लोकांशी संपर्क ठेवणे आगामी काळात फायद्याचे राहील चालू घडामोडी एकादी घटना किंवा जनहितकारी योजनेची माहिती अधिकाधिक लोकांपर्यंत पोहोचण्याचा असा जनसमुदाय अग्रेसर राहू शकतो, अशा समुदायाला जोडून घेण्याकरता "फ्रेंड्स ऑफ बीजेपी" हे अभियान राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी सुरू केले आहे.

यावेळी यावेळी शहराध्यक्ष शंकर जगताप, राष्ट्रीय महिला आघाडीच्या प्रवक्त्या उषा वाजपेयी आणि मावळ लोकसभा संयोजक प्रमोद देशक यांनी दोन्ही नूतन संयोजकांचे अभिनंदन करताना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. विविध माध्यमांच्या माध्यमातून पक्ष प्रत्येक नागरिकापर्यंत पोचण्याचा प्रयत्न करत असतो. मात्र, अनेकदा केवळ संवादाच्या माध्यमातून नागरिकांमध्ये पक्षाची विचारधारा रुजविणे, वाढविणे, सरकारच्या जनहितकरी योजना लोकांपर्यंत पोहचविण्याचे काम ‘फ्रेंड्स ऑफ बीजेपी’ हे सातत्याने करत असतात. सामान्य नागरिकांमध्ये राहताना, सामान्य नागरिकांचा निवडणुकीसंदर्भात, पक्षाच्या संदर्भात असणारा ‘मूड’ यांच्या माध्यमातून कार्यकर्त्यापर्यंत पोचतो, याचा फायदा पक्षाला रणनीती ठरविण्यासाठी होतो, असे शंकर जगताप यावेळी बोलताना म्हणाले.

> “ कोणतीही राजकीय महत्वाकांक्षा न बाळगता ‘फ्रेंड्स ऑफ बीजेपी’ पक्षाला नागरिकांपर्यंत आणि नागरिकांना पक्षापर्यंत पोचवत असतात. यामुळे पक्षाचा जनाधार वाढण्यास निश्चित फायदा होतो. श्री. भोगले व श्री. प्रभुणे हे दोघे देखील पक्षाची विचारधारा शेवटच्या नागरिकांपर्यंत पोहचविण्यास मोठा हातभार लावतील, अशी मला आशा आहे.
>
> **- शंकर जगताप,**
> शहराध्यक्ष, भाजपा पिंपरी चिंचवड

---

# आरटीओच्या वायुवेग पथकाची खासगी बसवर कारवाई !

## धोकादायक प्रवासी वाहतूकीला आळा

। पिंपरी ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

**नियमबाह्य प्रवास करणाऱ्या खासगी बसला आरटीओच्या वायुवेग पथकाने चाप लावला आहे. वाहनचालकाच्या वाहन परवाना बरोबरच वाहनाची नोंदणी रद्द करण्याची कारवाई वायुवेग पथकाने केली आहे. पथकाच्या या कारवाईमुळे धोकादायक प्रवासी वाहतूकीला आळा बसला आहे. ही कारवाई पिंपरी-चिंचवड प्रादेशिक परिवहन कार्यालयातील वायुवेग पथकातील मोटार वाहन निरीक्षक प्रकाश मुळे, सहायक मोटार वाहन निरीक्षक रविंद्र गावडे, गीतांजली काळे यांनी केली.**



बस क्रमांक UP31T9217 वर आसन क्षमतेपेक्षा जास्त प्रवासी वाहतुक केल्यामुळे कारवाई करण्यात आली आहे. सदर वाहनाची आसन क्षमता 24 सिट्स आणि 15 बर्थ अशी एकूण 39 प्रवासी एवढी असताना सदर वाहनातून 80 प्रवाशांची वाहतूक करताना आढळून आले. सदर वाहनाची तपासणी करण्यात आली. प्रथम उपचार पेटी, अग्निशामक यंत्रणा तसेच आपत्कालीन यंत्रणा नसल्याचे आढळून आले. सदर वाहनाच्या खिडकीचे काच तुटलेले होते. तसेच रिफ्लेक्टर, टेल लॅम्प कार्यान्वीत नव्हते. सदर वाहनात टपावरुन मालाची वाहतुक केली जात होती. हे वाहन 5 टन ओव्हरलोड असल्याचे पाहणीत निष्पन्न झाले.

### परवाना (परमीट) निलंबित करण्याची कार्यवाही


» नियमबाह्य प्रवास करणाऱ्या या बसवर कारवाई करण्यात आली. सदर वाहन प्रादेशिक परिवहन कार्यालय, पिंपरी चिंचवड येथे अटकावून ठेवण्यात आले आहे. वाहन चालकाची अनुज्ञप्ती निलंबीत करणे, वाहनाची नोंदणी निलंबित करणे, वाहनाचे योग्यता प्रमाणपत्र रद्द करणे व वाहनाचा परवाना (परमीट) निलंबित करणे याबाबतची कार्यवाही सुरु करण्यात आली आहे. एखाद्या वाहनातून क्षमतेपेक्षा जास्त प्रवाशांची वाहतुक केली जात असल्यास या कार्यालयाच्या MH14PROSECUTION@GMAIL.COM या ई-मेल आयडी वर तक्रार करावी. तसेच अशा वाहनातून प्रवास करणे सुरक्षिततेच्या दृष्टीने टाळावे, असे आवाहन पिंपरी-चिंचवड प्रादेशिक परिवहन कार्यालयाने केले आहे.

# 'बीआरआय'ची झळाळी ओसरली?




**आंतरराष्ट्रीय राजकारण आणि अर्थकारणात चीनचा दबदबा वाढू लागल्याचे सुस्पष्ट चिन्ह म्हणून 'बेल्ट अँड रोड इनिशिएटिव्ह' (बीआरआय) या प्रकल्पाकडे गेल्या दशकात पाहिले गेले. महासत्ता बनायचे, तर जगातील अविकसित आणि अर्धविकसित देशांच्या आर्थिक नाड्याही हाती हव्यात या मूळ वसाहतवादी भूमिकेतून चीनने हा महत्त्वाकांक्षी प्रकल्प सुरू केला.**

या प्रकल्पाला दहा वर्षे पूर्ण झाल्याच्या निमित्ताने १७ आणि १८ ऑक्टोबर रोजी बीजिंगमध्ये चीनचे अध्यक्ष क्षी जिनपिंग यांच्या पुढाकाराने लाभार्थी राष्ट्रप्रमुखांची परिषद भरवली जात आहे. रशियाचे अध्यक्ष व्लादिमीर पुतिन यांची उपस्थिती यात विशेष उल्लेखनीय ठरते. ही परिषद आणि त्याअंतर्गत होत असलेल्या जिनपिंग-पुतिन भेटीच्या निमित्ताने ही मैत्री तसेच चीनचे विद्यमान आंतरराष्ट्रीय राजकारणातील मोक्याचे स्थान अधोरेखित करण्याचा चीनचा प्रयत्न आहे. गेल्या महिन्यात नवी दिल्लीत झालेल्या जी-२० गटाच्या राष्ट्रप्रमुख शिखर परिषदेला जिनपिंग गैरहजर राहिले. त्यांची ही अनुपस्थिती विशेष उल्लेखनीय ठरली होती. भारताचे वाढते महत्त्व सहन होत नसल्यामुळे आणि भारत-चीन यांच्यातील विद्यमान सीमावादामुळे जिनपिंग गैरहजर राहिल्याची चर्चा झाली. बीजिंग परिषदेस पंतप्रधान नरेंद्र मोदीही जाणार नाहीत.



पण जिनपिंग आणि मोदी यांच्या अनुपस्थितीमध्ये मूलभूत फरक आहे. 'बीआरआय'च्या याआधीच्या (२०१७, २०१९) परिषदांमध्ये भारत सहभागी झाला नव्हता. कारण या प्रकल्पाला भारताचा मूलभूत मुद्द्यावर विरोध आहे. 'बीआरआय'चा भाग असलेली चीन-पाकिस्तान आर्थिक मार्गिका (सीपीईसी) पाकव्याप्त काश्मीरमधून जाते. भारताच्या प्रखर विरोधाला न जुमानता या भागातून पाकिस्तान आणि चीनने हा प्रकल्प रेटला. त्यामुळे सुरुवातीपासूनच भारत या प्रकल्पाच्या बाहेर राहिला. तरीदेखील पाकिस्तान, नेपाळ, श्रीलंका, म्यानमार आणि बांगलादेशसारखे भारताचे शेजारी देश या प्रकल्पात सहभागी असल्यामुळे, भूराजकीय परिप्रेक्ष्यात या प्रकल्पाकडे पाहणे आपल्यासाठी क्रमप्राप्त ठरते.

दोन मुद्द्यांचा विचार त्यासाठी करावा लागेल. 'बीआरआय' हा चीनचा प्रभाव वृद्धिगत करण्यासाठीचा प्रकल्प आहे हे खरेच. हा पहिला मुद्दा. क्षी जिनपिंग यांच्या महत्त्वाकांक्षेतून त्याला आकार देण्यात आला. यात लक्षात घेण्यासारखी बाब म्हणजे, जिनपिंग यांनी ठरवल्यानंतर प्रकल्पाला सुरुवात वगैरे झालेली नाही. चीनने या शतकाच्या पहिल्या दशकात उत्पादन, अभियांत्रिकी, पायाभूत सुविधा उभारणीच्या क्षेत्रात लक्षणीय प्रगती केली. निव्वळ तेवढ्यावर ते थांबले नाहीत. या प्रगतीची 'निर्यात' करण्याचा उपक्रम कटाक्षाने राबवण्यात आला. आशिया, आफ्रिका आणि दक्षिण अमेरिकेतील अनेक अविकसित आणि अर्धविकसित देशांना आपापल्या देशातील दळणवळण, बंदरे, रस्ते, रेल्वेसारख्या सुविधांच्या उभारणीसाठी चिनी तंत्रज्ञान, तंत्रज्ञ हे इतर प्रगत देशांच्या तुलनेने स्वस्तात उपलब्ध झाले. दळणवळणाच्या सुविधा आणि साधने जितकी प्रगत तितकी आर्थिक प्रगती आणि स्थैर्य तत्पर नि शाश्वत हा तर जगभरचा नियमच आहे. तंत्रज्ञान निर्यातीच्या माध्यमातून प्रभावक्षेत्र विस्तारण्याचे श्रेय मात्र नि:संशय जिनपिंग यांचेच. त्यांनी विविध प्रकल्पांना 'बीआरआय'च्या छत्राखाली आणले. त्याला आकार दिला. यांतील एक प्रकल्प प्राचीन रेशीम व्यापारमार्गाशी संलग्न म्हणजे चीन – मध्य आशिया – युरोप असा आहे. दुसरा प्रकल्प अधिक व्यापक अशा सागरी मार्गाशी संलग्न आहे. आणखी एक मुद्दा आर्थिक क्षमतेचा. या प्रकल्पाची व्याप्ती मोठी आहे. जवळपास १२० हून अधिक देश या प्रकल्पाशी जोडले गेले आहेत. इटली या जी-सेव्हन गटातील एकमेव देशाने नुकतेच प्रकल्पातून बाहेर पडत असल्याचे जाहीर केले. अनेक देशांना प्रकल्पासाठी काढलेली कर्जे चुकवता आलेली नाहीत. पाकिस्तानसारख्या देशांमध्ये प्रकल्पासाठी गेलेल्या चिनी तंत्रज्ञांवर हल्ले झाले. श्रीलंकेच्या बाबतीत तेथील सरकारच्या चुकीच्या धोरणांमुळे तिजोरीत खडखडाट झाला नि कर्जफेडीसाठी बंदरे तारण ठेवण्याची वेळ आली. चीनने एका मर्यादेपलीकडे या प्रकल्पांना मदत करण्यास नकार दिला आहे. शिवाय कर्जे माफ करण्याबाबत कठोर पवित्रा अंगीकारला आहे.

## संपादकीय »

# मॅडमची मिस्टेक!

***मीरा बोरवणकर यांची कारकीर्द फारच कौतुकास्पद आणि त्यांचे निवृत्तीनंतरचे आयुष्य तर फारफारच कौतुकास्पद. सेवाकाळात त्यांच्यावर एकदाही कसलाही आरोप झाला नाही.***

मीरा बोरवणकर यांची कारकीर्द फारच कौतुकास्पद आणि त्यांचे निवृत्तीनंतरचे आयुष्य तर फारफारच कौतुकास्पद. सेवाकाळात त्यांच्यावर एकदाही कसलाही आरोप झाला नाही. अर्थात असा एकही आरोप ज्यांच्यावर होत नाही त्यांच्या उपयुक्ततेबाबत अलीकडच्या काळात प्रश्न निर्माण होतात हे खरे. पण मीरा बोरवणकर या त्या अर्थाने 'जुन्या' काळच्या प्रतिनिधी. त्या काळात काही तत्त्वे पाळली जात. कसलेही बालंट न येणे यात अभिमान मानण्याचा तो काळ. त्या सेवाकाळात बोरवणकरबाईंवर काही कसलेही आरोप झाले नाहीत आणि निवृत्तीनंतर एखाद्या पक्षाची खासदारकी, कोणत्या समित्यांवर नेमणूक किंवा गेला बाजार राज्य लोकसेवा आयोगात एखादे पद वगैरेही त्यांच्या वाट्याला आले नाही. तसे ते पदरात पडावे यासाठी सेवाकाळातच प्रयत्न करायचे असतात हे त्यांना माहीत नसणार.

**सर्वोच्च न्यायालयाने पंकज बन्सल याचिकेदरम्यान नुकतीच अंमलबजावणी संचालनालयास त्यांच्या मर्यादित आणि कायदेशीर कर्तव्यांची जाणीव करून दिली आहे. सर्वोच्च न्यायालयाने 'आम्ही ठरवू तीच प्रक्रिया आणि आम्ही ठरवू तोच गुन्हेगार' या अंमलबजावणी संचालनालयाच्या वृत्तीला चाप लावला. सर्वोच्च न्यायालयाने या प्रकरणात दिलेल्या निकालाच्या विरोधात आता अंमलबजावणी संचालनालय पुनर्विचार याचिका दाखल करणार असल्याचे समजते आहे.**

# पीएमएलए कायद्यासमोर पुन्हा आव्हान!

कायदेशीर पर्यायांचा वापर करण्याचा तपास यंत्रणांना अधिकार आहेच, परंतु एकंदर दाखल झालेल्या गुन्ह्यातील शिक्षेचे प्रमाण आणि गुन्हे दाखल होण्याचे प्रमाण बघता केंद्र सरकारप्रमाणेच केंद्रीय तपास यंत्रणांनाही कायद्यापेक्षा तपासावर आपली एकाधिकारशाही कायम ठेवायची आहे, असेच प्रतीत होते. केंद्रीय तपास यंत्रणांची कार्यपद्धती बघता त्यांना गुन्हे सिद्ध होण्यापेक्षा पीएमएलए कायद्याच्या तरतुदींचा गैरवापर करत केवळ गुन्हे दाखल करणे आणि अटक करणे यातच स्वारस्य असल्याचे दिसते.

या कायद्यात आजवर झालेल्या अत्यल्प शिक्षा या अंमलबजावणी संचालनालयाच्या राजकीय हेतूंकडे अंगुलिनिर्देश करणाऱ्या आहेत. गेल्या काही वर्षांत हे संचालनालय आणि त्यांच्या अखत्यारीत येणाऱ्या पीएमएलए कायद्याच्या विश्वासार्हतेवर मोठे प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे.



केंद्र सरकार, तपास यंत्रणा अद्यापही याबाबत जनतेच्या मनातील शंकांचे उत्तर देऊ शकलेल्या नाहीत. तर दुसरीकडे तपास यंत्रणांवर वाढता दबाव, कायद्याचा वाढता गैरवापर, मनाप्रमाणे कायद्याची अंमलबजावणी आणि व्याख्या निश्चित करण्याचे घटनाबाह्य कार्य तपास यंत्रणा करताना दिसताहेत. न्यायालयीन अधिकारांच्या कक्षेत जात अंमलबजावणी संचालनालयाने आपल्या मर्यादा ओलांडण्याचेही अनेकदा प्रयत्न केले. याच कारणास्तव सर्वोच्च न्यायालयाचा पंकज बन्सल प्रकरणातील निकाल महत्त्वाचा ठरतो. तो समजून घेण्यासाठी अंमलबजावणी संचालनालय तसेच पीएमएलए कायद्याच्या न्यायालयीन आणि प्रशासकीय इतिहासाकडे एक कटाक्ष टाकणे गरजेचे आहे. २०१७ साली सर्वोच्च न्यायालयाने पीएमएलए कायद्यातील कलम ४५ बाबत निकाल देत राज्यघटनेच्या अनुच्छेद १४ आणि २१ चे उल्लंघन करणारी तरतूद असल्याने घटनाबाह्य ठरवली. केंद्र सरकारने पीएमएलए कायद्यात जामीन मिळू नये यासाठी ती तरतूद अधिक कठोर करत त्यात सुधारणा केली. २०२२ साली सर्वोच्च न्यायालयाने विजय मंडल चौधरी विरुद्ध केंद्र सरकार प्रकरणात त्यातील जामिनासाठी गरजेच्या जुळ्या तरतुदी सांविधानिक असल्याचा निकाल दिला. १८ ऑक्टोबरपासून सर्वोच्च न्यायालयाचे त्रिसदस्यीय पीठ पीएमएलए कायद्यातील अनुच्छेद ४५ बाबत सप्टेंबर २०२२ रोजी दिलेल्या निकालाचा पुनर्विचार करणार असल्याचे प्रसिद्ध झाले आहे.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक : *वैष्णव जाधव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक : MH-26-0158827. (विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# केवळ मतांच्या राजकारणाचा विचार!

## शरद पवारांच्या वक्तव्यावरून देवेंद्र फडणवीसांचा टोला

। मुंबई । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**इस्लायल-हमास युद्धामुळे संपूर्ण जगाची दोन गटांत विभागणी झाली आहे. अमेरिका, इंग्लंड, फ्रान्स, इटली आणि भारतासह अनेक शक्तीशाली राष्ट्रांनी इस्रायलला पाठिंबा दर्शवला आहे. तसेच या राष्ट्रांनी इस्रायलवरील दहशतवादी हल्ल्याचा निषेध नोंदवला आहे. दुसऱ्या बाजूला, लेबनान, इराण, सौदी अरब, जॉर्डनसारखी मुस्लीम राष्ट्रे पॅलेस्टाईनच्या बाजूने उभी आहेत.**





भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी इस्रायलचे पंतप्रधान बेंजामिन नेतन्याहू यांच्याशी फोनवर बोलून भारत या युद्धात इस्रायली जनतेच्या बाजूने खंबीरपणे उभा आहे असा संदेश दिला आहे. परंतु, आपल्या देशातील काही संघटना आणि पक्षांनी वेगळी भूमिका घेतली आहे. पॅलेस्टाईनच्या समर्थनात काही संघटनांनी उत्तर प्रदेश, कोलकाता आणि चेन्नईत मोर्चे काढल्याचं अलिकडेच पाहायला मिळालं. त्याचबरोबर काही पक्षांनीदेखील पॅलेस्टाईनची बाजू घेतली आहे. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे सर्वेसर्वा शरद पवार यांनीही पॅलेस्टिनी जनतेच्या समर्थनात भूमिका मांडली आहे. एका कार्यक्रमात शरद पवार राष्ट्रवादी काँग्रेसच्या (शरद पवार गट) कार्यकर्त्यांना म्हणाले, जिथे युद्ध सुरू आहे ती जमीन पॅलेस्टिनी लोकांची आहे. तिथे आधी अतिक्रमण करण्यात आलं आणि मग इस्रायल देश उदयाला आला. मला या प्रकरणाच्या खोलात जायचं नाही. परंतु, भारताचे पहिले पंतप्रधान जवाहरलाल नेहरूंपासून, इंदिरा गांधी, राजीव गांधी आणि अटल बिहारी वाजपेयी या सर्वांची पॅलेस्टाईनला मदत करण्याची भूमिका होती. दुर्दैवाने आपल्या देशाच्या पंतप्रधानांनी (नरेंद्र मोदी) मात्र यावेळी इस्रायलची बाजू घेतली आहे. ते करत असताना त्या जमिनीचे मूळ मालक असलेल्या पॅलेस्टाईनकडे त्यांनी पूर्णपणे दुर्लक्ष केलं आहे. पंतप्रधानांची भूमिका काहीही असो, परंतु, आपली म्हणजेच राष्ट्रवादी काँग्रेसची भूमिका स्वच्छ असायला हवी. या वक्तव्यानंतर शरद पवार हे भाजपा नेत्यांच्या टीकेचे धनी बनले आहेत. अनेक भाजपा नेत्यांनी शरद पवारांना टोला लगावला आहे. महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीदेखील पवारांवर टिकास्र सोडलं आहे.

यात फडणवीसांनी म्हटलं आहे, इस्रायल-पॅलेस्टाईन वादात भारताने आपली भूमिका कधीच बदलली नाही. मात्र, त्याचवेळी भारताने दहशतवादाचा विरोध केला आहे. मग तो कुठल्याही स्वरुपात आणि कुणाच्याही विरोधात असो, दहशतवादाला भारताने कायमच कडाडून विरोध केला आहे. फडणवीस यांनी म्हटलं आहे, इस्रायलमध्ये जेव्हा निष्पाप लोक मारले गेले, तेव्हा संपूर्ण जगाने त्याची कडाडून निंदा केली. तसाच निषेध भारतानेही केला. शरद पवार यांनीही तेच करायला हवे. कारण, दहशतवादी हल्ल्याच्या यातना मुंबईने अधिक सोसल्या आहेत. विशेषत: २६/११ च्या वेळी मुंबईने अनेक नागरिक गमावले. माझी शरद पवार यांना विनंती आहे की, केवळ मतांच्या राजकारणाचा विचार करु नका, तर दहशतवादाचा तीव्र शब्दात धिक्कार करा.

### पॅलेस्टाईनकडे पूर्णपणे दुर्लक्ष केलं

जिथे युद्ध सुरू आहे ती जमीन पॅलेस्टिनी लोकांची आहे. तिथे आधी अतिक्रमण करण्यात आलं आणि मग इस्रायल देश उदयाला आला. मला या प्रकरणाच्या खोलात जायचं नाही. परंतु, भारताचे पहिले पंतप्रधान जवाहरलाल नेहरूंपासून, इंदिरा गांधी, राजीव गांधी आणि अटल बिहारी वाजपेयी या सर्वांची पॅलेस्टाईनला मदत करण्याची भूमिका होती. दुर्दैवाने आपल्या देशाच्या पंतप्रधानांनी (नरेंद्र मोदी) मात्र यावेळी इस्रायलची बाजू घेतली आहे. ते करत असताना त्या जमिनीचे मूळ मालक असलेल्या पॅलेस्टाईनकडे त्यांनी पूर्णपणे दुर्लक्ष केलं आहे. पंतप्रधानांची भूमिका काहीही असो, परंतु, आपली म्हणजेच राष्ट्रवादी काँग्रेसची भूमिका स्वच्छ असायला हवी.

# आदित्य ठाकरेंची उच्च न्यायालयात धाव

## सुशांतसिंह, दिशा सालियन मृत्यू प्रकरण

। मुंबई ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**अभिनेता सुशांतसिंह राजपूत आणि त्याची माजी व्यवस्थापक दिशा सालियन यांच्या मृत्यू प्रकरणाच्या सीबीआय चौकशीची फौजदारी स्वरूपाच्या जनहित याचिकेद्वारे मागणी करण्यात आली आहे. या पार्श्वभूमीवर, या याचिकेवर कोणताही निर्णय देण्यापूर्वी आपली बाजू ऐकण्यात यावी यासाठी आमदार आदित्य यांनी उच्च न्यायालयात धाव घेऊन कॅव्हेट दाखल केले आहे.**



### दिशा हिची हत्या झाली ?

दुसरीकडे, दिशा हिचा ८ जून २०२० रोजी मालाड येथील निवासी इमारतीच्या १४व्या मजल्यावरून पडून मृत्यू झाला होता. मुंबई पोलिसांनी या प्रकरणीही अपघाती मृत्यूची नोंद केली होती. दिशा हिची हत्या झाली असून आदित्य यांचा या हत्येशी संबंध असल्याचा आरोप भाजप नेते नारायण राणे यांनी केला होता. त्यांनीही या प्रकरणी चौकशीची मागणी केली होती.

आदित्य यांनी वकील राहुल आरोटे यांच्यामार्फत हे कॅव्हेट दाखल केले आहे. त्यात त्यांनी, सीबीआयकडूनच या प्रकरणाची चौकशी केली जात आहे. असे असताना याचिकेद्वारे पुन्हा तीच मागणी कशी काय केली जाऊ शकते ? असा प्रश्न उपस्थित केला आहे.

तसेच, ही फौजदारी जनहित याचिका सुनावणी घेण्यायोग्य नसल्याचा दावा केला आहे. 'सुप्रीम कोर्ट ॲण्ड हायकोर्ट लिटिगंट्स असोसिएशन ऑफ इंडिया'ने अध्यक्ष रशीद खान पठाण यांच्यामार्फत सप्टेंबरमध्ये ही फौजदारी स्वरूपाची जनहित याचिका केली होती. तसेच, सुशांत आणि दिशा यांच्या गूढ मृत्यूप्रकरणी ठाकरे यांना तात्काळ अटक करण्याची आणि त्यांच्या चौकशीची मागणी केली होती. याचिका अद्याप सुनावणीसाठी आलेली नाही.

सुशांत हा १४ जून २०२० रोजी वांद्रे येथील त्याच्या घरामध्ये मृतावस्थेत आढळला होता. मुंबई पोलिसांनी या प्रकरणी अपघाती मृत्यूची नोंद करून चौकशी सुरू केली असताना, सुशांत याच्या वडिलांनी त्याची मैत्रीण आणि अभिनेत्री रिया चक्रवर्ती व तिच्या कुटुंबीयांनी त्याला आत्महत्येस प्रवृत्त केल्याचा आरोप केला होता. तसेच, बिहार पोलिसांत तक्रार दाखल केली होती.

नंतर, हे प्रकरण सीबीआयकडे वर्ग करण्यात आले. रिया आणि तिच्या कुटुंबीयांवरील आर्थिक गैरव्यवहाराच्या आरोपांची सक्तवसुली संचालनालयातर्फे (ईडी) चौकशी सुरू आहे. याशिवाय, रिया ही अमलीपदार्थांचे सेवन करत होती आणि तिने ते सुशांतलाही दिल्याच्या आरोपांचा केंद्रीय अमलीपदार्थ नियंत्रण विभाग तपास करत आहे.

# भाजपमध्ये दक्षिण-उत्तर वाद पेटला!

। नगर ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या दि. २६ ऑक्टोबरच्या शिर्डी दौऱ्याच्या पार्श्वभूमीवर जिल्हा भाजपमध्ये दक्षिण-उत्तर असा वाद निर्माण झाला आहे. महसूल मंत्री तथा पालकमंत्री राधाकृष्ण विखे यांच्या पुढाकारातून पंतप्रधानांसह भाजपच्या बहुतांशी वरिष्ठ नेत्यांचे जिल्ह्याच्या उत्तर भागात, विखे यांच्या मतदारसंघात दौरे-कार्यक्रम होत आहेत. दक्षिण भाग त्यापासून वंचित राहत आहे, असा आक्षेप पक्षातीलच नेते, आजी-माजी आमदार घेऊ लागले आहेत. पंतप्रधानांच्या दौऱ्याच्या पार्श्वभूमीवर आज, मंगळवारी नगरमध्ये आयोजित केलेल्या पक्षाच्या मेळाव्यातही त्याचे पडसाद उमटले. त्याची दखल घेत अखेर महसूल मंत्री तथा पालकमंत्री राधाकृष्ण विखे यांनी नगर शहरात केंद्रीय गृहमंत्री तथा सहकार मंत्री अमित शहा यांचा कार्यक्रम आयोजित केला जाईल तसेच पंतप्रधानांनाही निमंत्रित केले जाईल असे जाहीर केले. या वादाला दोन दिवसापूर्वीच माजी मंत्री तथा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे अध्यक्ष शिवाजी कर्डिले यांनी तोंड फोडले. नगर शहरातील 'महसूल भवन' इमारतीच्या भूमिपूजन कार्यक्रमाप्रसंगी त्यांनी मंत्री विखे यांच्या प्रयत्नातून पक्षाचे मोठे नेते शिर्डीतच येत आहेत, आता आम्हाला दक्षिण भागात एखादे साई मंदिर उभे करावे लागेल, तेव्हा कोठे दक्षिण भागात दौरे होतील, असे सांगत तोंड फोडले होते. त्यानंतर आज पंतप्रधान दौऱ्याच्या नियोजनासाठी पक्षाच्या कार्यकर्त्यांच्या उपस्थितीत बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीतही माजी मंत्री आमदार राम शिंदे यांनी पंतप्रधान, त्याआधी केंद्रीय मंत्री अमित शहा, संरक्षण मंत्री राजनाथ सिंग, शासन आपल्या दारी असे सारे कार्यक्रम जिल्ह्याच्या उत्तर भागातच आयोजित केले जात आहेत. दक्षिणेतही एखादा कार्यक्रम घ्या, असा टोला महसूल मंत्री विखे यांना लगावला.

# राहुल-प्रियांका तेलंगणा निवडणूक प्रचारात!

## केसीआर यांनी अनेक आश्वासने दिली, पण एकही आश्वासन पूर्ण केले नाही

। नवी दिल्ली ।

**वृत्तसंस्था : महाईन्यूज**

**राहुल गांधी आणि प्रियांका गांधी-वढेरा तेलंगणातील मुलुगु जिल्ह्यातील रामाप्पा मंदिरात पोहोचले. या ठिकाणी त्यांनी पूजा-अर्चना केल्यानंतर दोन्ही नेत्यांनी रोड शो केला. यानंतर त्यांनी महिला परिषदेला संबोधित केले. तेलंगणाला दिलेल्या हमीपत्रावर आम्ही काम सुरू केल्याचे प्रियांका म्हणाल्या. केसीआर यांनी अनेक आश्वासने दिली, पण एकही आश्वासन पूर्ण केले नाही.**



राज्यात त्यांची घोटाळ्यांची मालिका सुरूच आहे, असा घणाघात राहुल गांधी यांनी केसीआर यांच्यावर केला. मुलुगु येथील काँग्रेस आमदार दानसारी अनसूया यांनी वृत्तसंस्थेला सांगितले की, रॅलीनंतर प्रियंका आजच दिल्लीला परतणार आहेत. राहुल येथे तीन दिवस राहणार आहेत. काँग्रेसच्या सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, राहुल 18 ऑक्टोबरला भूपालपल्ली येथे मुक्काम करतील. 19 ऑक्टोबर रोजी ते सरकारी खाण कंपनी सिंगारेनी कोलीरीजच्या कामगारांना भेटतील आणि पेड्डापल्ली आणि करीमनगर येथील बैठकांना उपस्थित राहतील. 20 ऑक्टोबर रोजी ते अरमुर आणि निजामाबाद येथे पक्षाच्या कार्यक्रमांना उपस्थित राहतील तसेच जगतियाल येथील शेतकरी मेळाव्यात सहभागी होतील. राहुल यांच्या दौऱ्यापूर्वी 15 ऑक्टोबर रोजी काँग्रेसने राज्यातील 55 उमेदवारांची नावे जाहीर केली होती. तेलंगणा विधानसभेचा कार्यकाळ 16 जानेवारी 2024 रोजी संपत आहे. 119 जागा असलेल्या तेलंगणात 30 नोव्हेंबरला मतदान होणार आहे. डिसेंबर 2018 मध्ये येथे शेवटच्या विधानसभा निवडणुका झाल्या आणि तेलंगणा राष्ट्र समितीने सरकार स्थापन केले. चंद्रशेखर राव दुसऱ्यांदा मुख्यमंत्री झाले. तेलंगणात 2018 च्या विधानसभा निवडणुकीत काँग्रेसला 19 जागा मिळाल्या होत्या. भाजपच्या खात्यात केवळ एक जागा आली. सध्याचे मुख्यमंत्री के चंद्रशेखर राव यांचा पक्ष TRS (पक्षाचे नाव तेलंगणा राष्ट्र समिती वरून बदलून 2022 मध्ये भारत राष्ट्र समिती असे करण्यात आले) यांना सर्वाधिक 88 जागा मिळाल्या होत्या. सध्याच्या परिस्थितीबद्दल बोलायचे झाले तर सत्ताधारी पक्षाकडे सध्या विधानसभेच्या 119 जागांपैकी 101 आमदार आहेत. असदुद्दीन ओवेसी यांच्या पक्ष एआयएमआयएमकडे 7 आमदार आहेत, तर काँग्रेसकडे पाच, भाजपकडे तीन, एआयएफबीकडे एक, एक नामनिर्देशित आणि एक अपक्ष आमदार आहे. 9 ऑक्टोबर रोजी निवडणूक आयोगाने मध्य प्रदेश, राजस्थान, छत्तीसगड, तेलंगणा आणि मिझोराममधील विधानसभा निवडणुकांच्या तारखा जाहीर केल्या.

### 30 नोव्हेंबरला तेलंगणात मतदान

» तेलंगणात 2018 च्या विधानसभा निवडणुकीत काँग्रेसला 19 जागा मिळाल्या होत्या. सध्याचे मुख्यमंत्री के चंद्रशेखर राव यांच्या पक्ष TRS (पक्षाचे नाव तेलंगणा राष्ट्र समिती वरून बदलून 2022 मध्ये भारत राष्ट्र समिती असे करण्यात आले) यांना सर्वाधिक 88 जागा मिळाल्या होत्या. या राज्यांतील निवडणूक प्रक्रिया 27 दिवस चालणार आहे. मिझोराममध्ये ७ नोव्हेंबरला पहिले मतदान होणार आहे. यानंतर 17 नोव्हेंबरला मध्य प्रदेशात मतदान होणार आहे. छत्तीसगडमध्ये 7 नोव्हेंबर आणि 17 नोव्हेंबरला दोन टप्प्यात मतदान होणार आहे. त्यानंतर 25 नोव्हेंबरला राजस्थान आणि 30 नोव्हेंबरला तेलंगणामध्ये मतदान होणार आहे. 3 डिसेंबर रोजी सर्व 5 राज्यांचे निकाल एकाच वेळी येतील.

# राज्यपाल इकडे तिकडे फिरत असतात

## कृषी रोडमॅप कागदावरच राहणार नाही : आर्लेकर

। नवी दिल्ली ।

**वृत्तसंस्था : महाईन्यूज**

**चौथा कृषी रोड मॅप 2023 बिहारमध्ये सुरू झाला आहे. पाटणा येथील बापू सभागृहात राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते त्याचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी द्रौपदी मुर्मू म्हणाल्या की, राष्ट्रपतिपद सोडल्यानंतर मी माझ्या गावी जाऊन शेती करणार आहे. मुख्यमंत्री नितीश यांनी राष्ट्रपतींना दर 4 महिन्यांनी बिहारला भेट देण्याची विनंती केली होती. त्यावर ते म्हणाले की, बिहारही माझे राज्य आहे. माझे पूर्वज एकेकाळी येथे राहत होते. मी एका शेतकऱ्याची मुलगी आहे. मला कृषी रोडमॅपची सर्व माहिती मिळवायची आहे. अध्यक्षपद सोडल्यानंतर मी माझ्या गावी जाऊन शेती करणार आहे.**



### बेरोजगारी हा बिहारचा सर्वात मोठा शत्रू

» उपमुख्यमंत्री तेजस्वी म्हणाले की, आम्ही अभ्यास, औषधे, सिंचन, सुनावणी आणि कृती करत आहोत. अनेक राज्ये बिहारच्या मागे आहेत. बेरोजगारी हा बिहारचा सर्वात मोठा शत्रू आहे. बिहारमध्ये नोकऱ्या दिल्या जात आहेत. आम्ही जातीची जनगणना करण्याचे आश्वासन दिले होते. इतर कोणत्याही राज्याने असे केले नाही. हा शेतीसाठीचा रोडमॅप नसून बिहारच्या समृद्धीचा रोडमॅप आहे. बिहारने हे काम केले आहे. राष्ट्रपतींनी आम्हाला वेळ दिल्याबद्दल आम्ही त्यांचे मनःपूर्वक आभारी आहोत. राज्यपालांचेही आभार.

कार्यक्रमाला संबोधित करताना सीएम नितीश यांनी बिहारच्या राज्यपालांना सांगितले की, राज्यपाल इकडे-तिकडे फिरत असतात. विविध ठिकाणी जाऊन कृषी रोड मॅपचे काम पाहण्याची विनंती करणार आहे. काही अडचण असल्यास विभागाला कळवा. राज्यपाल आर्लेकर यांनी नितीश सरकारला सल्ला देताना सांगितले की, जोपर्यंत शेतकरी जागरूक होत नाहीत आणि शेतकऱ्यांपर्यंत संदेश पोहोचत नाही, तोपर्यंत संपूर्ण योजना कागदावरच राहील. हा कार्यक्रम सर्वसामान्यांपर्यंत नेण्याची गरज असल्याचे ते म्हणाले. अधिकारी आणि मंत्र्यांनी एकत्र काम करण्याची गरज आहे. योजना शेतकऱ्यांपर्यंत पोहोचल्या नाहीत तर त्या कागदावरच राहतील.

आपले पंतप्रधान नेहमी म्हणतात की, शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट झाले पाहिजे. याकडेही लक्ष देण्याची गरज आहे. उत्पन्न दुप्पट कसे करता येईल यासाठी आपल्या पीक नियोजनात नवीन तंत्र शिकण्याची गरज आहे. खर्च कमी करून उत्पादन वाढवण्याची गरज आहे, तरच आपले उत्पन्न वाढू शकेल. त्यानंतर राज्यपाल म्हणाले की, येथील शेतकरी राजा व्हावा, अशी आमची इच्छा आहे. मुख्यमंत्री नितीश कुमार म्हणाले, 2025 पर्यंत प्रत्येक शेताला पाणी देण्याचे लक्ष्य आहे. बिहारमधील शेती हा बिहारच्या अर्थव्यवस्थेचा कणा आहे. चौथ्या कृषी रोडमॅपसह बिहार पुढे जाईल.

# काँग्रेसला घराणेशाहीचा पक्ष म्हणालो नाही : थरूर

। नवी दिल्ली ।

**वृत्तसंस्था : महाईन्यूज**

काँग्रेस हा घराणेशाहीचा पक्ष असल्याच्या वक्तव्यापासून खासदार शशी थरूर यांनी स्वतःला दूर केले आहे. बुधवारी सोशल मीडियावर स्पष्टीकरण देताना थरूर म्हणाले- मी पक्षाबद्दल असे काहीही बोललो नाही. माझे विधान चुकीच्या पद्धतीने मांडण्यात आले. मी सोमवारी एका खासगी कार्यक्रमात दिलेले विधान औपचारिक विधान नव्हते. माझ्या विधानाचा चुकीचा अर्थ काढण्यात आला.

मी वारंवार सांगितले आहे की नेहरू/गांधी कुटुंबाचा डीएनए काँग्रेस पक्षाशी अतूटपणे जोडलेला आहे. कुटुंब ही पक्षाची ताकद आहे. राहुल गांधी हे पक्षाचे सर्वात आवडते नेते आहेत यात शंका नाही. काँग्रेस खासदार शशी थरूर सोमवारी तिरुअनंतपुरममधील एका टेक कंपनीच्या कार्यालयाच्या उद्घाटन कार्यक्रमाला गेले होते. येथे प्रसारमाध्यमांशी संवाद साधताना पत्रकारांनी त्यांना विचारले की, 2024च्या लोकसभा निवडणुकीत भारत आघाडीने विजय मिळवला तर काँग्रेसकडून पंतप्रधानपदाचा दावेदार कोण असेल? याला उत्तर देताना थरूर यांनी अमेरिकेतील संसदीय निवडणूक प्रक्रियेचे उदाहरण दिले होते. थरूर म्हणाले होते- अमेरिकेत मतदार प्रायमरीद्वारे उमेदवार निवडतात, जो नंतर पक्षाच्या तिकिटावर राष्ट्राध्यक्षपदाची निवडणूक लढवतो. ते म्हणाले की, भारतात कोणाला पंतप्रधान म्हणून पुढे करायचे आणि उमेदवार करायचे हे पक्ष ठरवतो. ते म्हणाले की, विरोधकांनी एकजूट केल्याने पुढील वर्षी होणाऱ्या निवडणुकीचे निकाल धक्कादायक असू शकतात. निवडणुकीच्या निकालानंतर सर्व पक्षांना एकत्र येऊन नेता निवडावा लागणार आहे. मला विश्वास आहे की, काँग्रेस पक्ष मल्लिकार्जुन खरगे किंवा राहुल गांधी यांना पंतप्रधान करण्याची ऑफर देऊ शकते. कारण अनेक अर्थांनी तो कुटुंब चालवणारा पक्ष आहे. जर खरगे पंतप्रधान झाले तर ते देशाचे पहिले दलित पंतप्रधान असतील.



# पाचव्या दिवशी केली जाते स्कंदमातेची पूजा!

वरात्रीचा पाचवा दिवस स्कंदमातेला समर्पित असतो. या दिवशी स्कंदमातेची विधीवत पूजा, अर्चना केली जाते. स्कंदमाता हे देवी पार्वतीचे दुसरे रूप मानले जाते. तिच्या मुलाचे नाव स्कंदकुमार असल्याने तिचे नाव स्कंदमाता पडले. शास्त्रानुसार स्कंदमाता नकारात्मक शक्तींचा नाश करून जीवनात सुख-समृद्धी आणते.

## स्कंदमातेची पूजा विधी आणि मंत्र

सर्व प्रथम ब्रह्म मुहूर्तावर उठून स्नान करावे. त्यानंतर पिवळे वस्त्र परिधान करून स्कंदमातेच्या मूर्तीसमोर किंवा प्रतिमेसमोर बसावे. देवीला पिवळी फुले व हार अर्पण करून पिवळ्या वस्तू अर्पण करा. देवीच्या मूर्तीसमोर दिवा लावा आणि व्रत कथा वाचावी. यानंतर मंत्रोच्चार करून देवीची आरती

## स्कंदमातेची व्रत कथा

धार्मिक मान्यतेनुसार, तारकासुर नावाचा एक असुर होता. तारकासुरला वाटले की महादेवाचे लग्न होणार नाही आणि त्यांना पूत्रही होणार नाही. त्यामुळे तो अमर आहे. तारकासुराने देवलोकात दहशत निर्माण केली तेव्हा सर्व देवतांनी महादेवाला लग्न करण्याची विनंती केली. महादेवाने माता पार्वतीशी विवाह केला आणि स्कंदकुमार नावाच्या पुत्राला जन्म दिला आणि त्याने तारकासुराचा अंत केला.



## -: मंत्र :-

या देवी सर्वभूतेषु
मातृरूपेण संस्थिता।
नमस्तस्यै नमस्तस्यै
नमस्तस्यै नमो नम।।
सिंहासनगता नित्यं
पद्माश्रितकरद्वया।
शुभदास्तु सदा
देवी स्कन्दमाता यशस्विनी।।

स्कंदमातेची आरती
जय तेरी हो स्कंद माता,
पांचवा नाम तुम्हारा आता।
सब के मन की जानन हारी,
जग जननी सब की महतारी।
तेरी ज्योत जलाता रहूं मैं,
हरदम तुम्हे ध्याता रहूं मैं।

कई नामो से तुझे पुकारा,
मुझे एक है तेरा सहारा।
कहीं पहाड़ों पर है डेरा,
कई शहरों में तेरा बसेरा।

हर मंदिर में तेरे नजारे गुण गाये,
तेरे भगत प्यारे भगति।
अपनी मुझे दिला दो शक्ति,
मेरी बिगड़ी बना दो।

इन्दर आदी देवता मिल सारे,
करे पुकार तुम्हारे द्वारे।
दुष्ट दत्य जब चढ़ कर आये,
तुम ही खंडा हाथ उठाये।
दासो को सदा बचाने आई,
चमन की आस पुजाने आई।

# न्यूझीलंडची विजयी घोडदौड सुरूच!

## » किवींनी अफगाणिस्तानचा 149 धावांनी उडवला धुव्वा

नवी दिल्ली ।
। वृत्तसंस्था

**विश्वचषकाच्या १६व्या सामन्यात न्यूझीलंडने अफगाणिस्तानचा १४९ धावांनी पराभव केला आहे. यासह अफगाण संघ गुणतालिकेत अव्वल स्थानावर पोहोचला आहे. चेन्नईच्या एमए चिदंबरम स्टेडियमवर अफगाणिस्तानचा कर्णधार हशमतुल्ला शाहिदीने नाणेफेक जिंकून गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. न्यूझीलंडने अफगाणिस्तानसमोर २८९ धावांचे लक्ष्य ठेवले होते. प्रत्युत्तरात अफगाणिस्तान संघ केवळ १३९ धावा करू शकला आणि १४९ धावांनी सामना गमावला.**



न्यूझीलंडने अफगाणिस्तानचा १४९ धावांनी पराभव केला आहे. या शानदार विजयासह किवी संघ आठ गुणांसह गुणतालिकेत अव्वल स्थानी पोहोचला आहे. या सामन्यात न्यूझीलंडने प्रथम फलंदाजी करताना सहा गडी गमावून २८८ धावा केल्या. प्रत्युत्तरात अफगाणिस्तानचा संघ ३४.४ षटकांत १३९ धावांवर गारद झाला. न्यूझीलंडकडून ग्लेन फिलिप्सने सर्वाधिक ७१ धावा केल्या. तर टॉम लॅथमने ६८ धावांची खेळी केली. सलामीवीर विल यंग ५४ धावा करून बाद झाला. अफगाणिस्तानकडून नवीन उल हक आणि अजमतुल्ला उमरझाईने प्रत्येकी दोन बळी घेतले. रशीद खान आणि मुजीब उर रहमान यांना प्रत्येकी एक विकेट मिळाली. अफगाणिस्तानकडून रहमत शाहने सर्वाधिक ३६ धावा केल्या. अजमतुल्लाने २७ धावांचे योगदान दिले. या दोघांशिवाय अफगाणिस्तानच्या एकाही फलंदाजाला २० धावांचा पल्ला गाठता आला नाही. न्यूझीलंडकडून मिचेल सॅंटनर आणि लॉकी फर्ग्युसनने प्रत्येकी तीन विकेट्स घेतल्या. ट्रेंट बोल्टला दोन गडी बाद करण्यात यश मिळाले. मॅट हेन्री आणि रचिन रवींद्र यांनी प्रत्येकी एक गडी बाद या दोघांना मदत केली. विजयासाठी मिळालेल्या २८९ धावांचा पाठलाग करताना अफगाणिस्तानचे दोन्ही सलामीवीर केवळ २७ धावांवर माघारी परतले. त्यानंतर कर्णधार हशमतुल्लाह शाहिदी व रहमत शहा यांनी भागीदारी करण्याचा प्रयत्न केला. मात्र, मिचेल सॅंटनर याने एक अफलातून झेल टिपत शाहिदीची खेळी संपुष्टात आणली. लॉकी फर्ग्युसन याने टाकलेल्या चौदाव्या षटकातील अखेरचा चेंडू आखूड टप्प्याचा आल्यानंतर शाहिदीने पुल करण्याचा प्रयत्न केला. हवेत उडालेला हा चेंडू स्क्वेअर लेगला उभ्या असलेल्या सॅंटनरपासून काहीशा अंतरावर होता. त्याने धावत जाऊन योग्य अंदाज घेत हा झेल पूर्ण केला. हा स्पर्धेतील आतापर्यंतचा सर्वोत्तम झेल असल्याचे बोलले जात आहे.

### सॅंटनरने टिपला शानदार झेल

» विजयासाठी मिळालेल्या २८९ धावांचा पाठलाग करताना अफगाणिस्तानचे दोन्ही सलामीवीर केवळ २७ धावांवर माघारी परतले. त्यानंतर कर्णधार हशमतुल्लाह शाहिदी व रहमत शहा यांनी भागीदारी करण्याचा प्रयत्न केला. मात्र, मिचेल सॅंटनर याने एक अफलातून झेल टिपत शाहिदीची खेळी संपुष्टात आणली. लॉकी फर्ग्युसन याने टाकलेल्या चौदाव्या षटकातील अखेरचा चेंडू आखूड टप्प्याचा आल्यानंतर शाहिदीने पुल करण्याचा प्रयत्न केला. हवेत उडालेला हा चेंडू स्क्वेअर लेगला उभ्या असलेल्या सॅंटनरपासून काहीशा अंतरावर होता. त्याने धावत जाऊन योग्य अंदाज घेत हा झेल पूर्ण केला.

**न्यूझीलंड :** डेव्हॉन कॉनवे, विल यंग, रचिन रवींद्र, डॅरिल मिशेल, टॉम लॅथम (यष्टीरक्षक/कर्णधार), ग्लेन फिलिप्स, मार्क चॅपमन, मिचेल सॅंटनर, मॅट हेन्री, लॉकी फर्ग्युसन, ट्रेंट बोल्ट.

**अफगाणिस्तान :** रहमानउल्ला गुरबाज, इब्राहिम झदरन, रहमत शाह, हशमतुल्ला शाहिदी (कर्णधार), अजमतुल्ला उमरझाई, इक्रम अलीखिल (विकेटकीपर), मोहम्मद नबी, रशीद खान, मुजीब उर रहमान, नवीन उल हक, फजलहक फारुकी.

# रोहित शर्माचा निष्काळजीपणा!

## » पुणे पोलिसांनी रोहितवर केली कारवाई

। कोल्हापूर ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**भारतीय कर्णधार रोहित शर्मने भरधाव वेगात कार चालवून नियमबाह्य वर्तन केलं आहे. त्यामुळे रोहित शर्माच्या विरोधात तीन चलन तयार झाले असून त्याचा दंड त्याला भरावा लागणार आहे. पुण्यात बांगलादेशविरुद्धच्या सामन्यापूर्वी भारतीय संघाच्या कर्णधाराने कार चालवत असताना एक दोनदा नाही तर तीनवेळा कार चालवण्याची वेग मर्यादा ओलांडली. एक्स्प्रेस वे वर वाहतुकीच्या नियमांचा भंग केल्याने त्याला दंड भरावा लागणार आहे. रोहित शर्मने त्याची स्पोर्ट्स कार वेग मर्यादेपक्षा जास्त वेगाने चालवल्याने त्याच्यावर ही कारवाई करण्यात आली आहे.**



### हा निष्काळजीपणाही चिंतेचा विषय

» ट्रॅफिक विभागातील एका सूत्राने सांगितल्यानुसार "विश्वचषकाच्या मध्यावर कर्णधाराने महामार्गावर अशी गाडी चालवणे अजिबात योग्य नाही. त्यांनी फक्त संघाच्या बसमधूनच प्रवास करावा आणि त्यांच्याबरोबर एक पोलीस वाहन असावे." हिटमॅनच्या चाहत्यांना त्याची शैली पूर्णपणे माहिती असेल. मात्र, विश्वचषकादरम्यान भारतीय कर्णधाराचा हा निष्काळजीपणाही चिंतेचा विषय ठरू शकतो.

अहमदाबादेतील भारत विरुद्ध पाकिस्तान सामना संपल्यानंतर टीम इंडियाचा कर्णधार रोहित शर्मा पवन हंस हेलिकॉप्टरने मुंबईला गेला होता. त्याने तिथे दोन दिवस आपल्या कुटुंबीयांसह वेळ घालवला. भारताच्या आगामी सामन्यासाठी उर्वरित संघ पुण्यात पोहचला होता. भारतीय कर्णधार रोहित शर्मा आधी मुंबईला गेला यानंतर त्याने पुण्याला जाण्यासाठी संघाच्या बस व्यतिरिक्त दुसरा मार्ग निवडला. रोहित त्याच्या स्पोर्ट्स कार लॅम्बोर्गिनी उरुसने पुण्यात पोहोचला.

दरम्यान, रोहितला मुंबईहून पुण्याच्या दिशेने वेगात गाडी चालवल्याबद्दल पुणे पोलिसांनी त्याच्यावर कारवाई केली आहे. मिळालेल्या वृत्तानुसार, भारतीय कर्णधाराने मुंबई-पुणे द्रुतगती महामार्गावर ताशी २०० किमी/प्रतितास वेगाने कार चालवली. त्यातल्या एकदा तर त्याच्या कारने ताशी २१५ किमी इतका प्रचंड वेग घेतला होता. नियम मोडून कार चालवल्याने पुणे वाहतूक पोलिसांनी त्याच्यावर दंड म्हणून तीन चलन आकारले आहेत.

# भारत-बांगलादेश सराव सत्रात पावसाची हजेरी!

नवी दिल्ली ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

एकदिवसीय विश्वचषक २०२३ मध्ये टीम इंडियाचा सामना गुरुवारी १९ ऑक्टोबर रोजी बांगलादेशशी होणार आहे. बांगलादेशचा संघ २५ वर्षांनंतर भारताविरुद्ध एकदिवसीय सामना खेळणार आहे. बांगलादेशने भारताविरुद्ध शेवटचा वनडे सामना १९९८ मध्ये भारतात वानखेडेवर खेळला होता. विश्वचषक २०२३ बद्दल बोलायचे झाले, तर भारतीय संघ उत्कृष्ट फॉर्ममध्ये आहे.

ऑस्ट्रेलियानंतर त्याने अफगाणिस्तान आणि पाकिस्तानला पराभूत केले आहे. दुसरीकडे, बांगलादेशचा संघ ३ पैकी २ सामन्यात पराभूत झाला आहे. त्याने अफगाणिस्तानचा पराभव केला होता. यानंतर त्याला इंग्लंड आणि न्यूझीलंडकडून पराभवाला सामोरे जावे लागले. भारत आणि बांगलादेश यांच्यातील सामना पुण्यातील महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशन स्टेडियमवर (एमसीए) होणार आहे. एमसीएबद्दल बोलायचे तर, २०१७ पूर्वी फलंदाजी करणाऱ्या संघांनी येथे पाच पैकी तीन एकदिवसीय सामन्यांमध्ये ३०० पेक्षा जास्त धावा केल्या आहेत.

लहान सीमारेषेमुळे खूप धावा होतात. मात्र, या मैदानावर नऊ महिन्यांतील भारत आणि बांगलादेश यांच्यातील हा पहिलाच आंतरराष्ट्रीय सामना असेल. यानंतरही ही खेळपट्टी फलंदाजांना अनुकूल असेल. पुण्याच्या हवामानाबद्दल बोलायचे झाले, तर बुधवारी सायंकाळी तुरळक पावसाने हजेरी लावली. एमसीए स्टेडियमवर दोन्ही संघांच्या सराव सत्रादरम्यान रिमझिम पावसामुळे मैदानावरील कर्मचाऱ्यांना मुख्य खेळपट्टी झाकण्यासाठी धावपळ करावी लागली.